Aarhat Publication & Aarhat Journal's

# ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (EIIRJ)

Peer Reviewed Interdisciplinary Research Journal

ISSN- 2277-8721

Online and Print Journal

Impact Factor: 5.20 (EduIndex)

UGC Approved Journal No - 48833

Vol VII Issue No I

( Jan – Feb 2018 )

**Chief –Editor**

**Mr.Amol Ubale**

CamScanner

# संयुक्त महाराष्ट्राच्या सिमाभागीय आंदोलनात उध्दवराव पाटील यांचे योगदान

**प्रा. वटाणे कल्याण राजेंद्र**

*सहायक प्राध्यापक, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत, जिल्हा– अहमदनगर*

आजतागायत संयुक्त महाराष्ट्र आंदोलना संदर्भात विपुलप्रमाणात लेखन झाले असले तरी महाराष्ट्र राज्याची स्थापना ही मुख्यत्वे करुन भाषावार प्रांतरचना या कार्यक्रमानुसार झाली हे मान्य करावे लागते. भारतीय राज्यघटनेने भाषिक प्रांत रचनेचे तत्व स्वीकारले आहे. महाराष्ट्राबाहेरुन येणाऱ्याची संख्याही लक्षणीय आहे. त्यांची जपणूकीची जबाबदारी व्यापक दृष्टीकोणातून मराठी माणसावरच आहे हे ज्ञानेश्वरीच्या शेवटच्या अध्यायातील 'जो जे वांच्छिल तो ते लाहो' यावरुन दिसून येतेत्र[1] सन बाराव्या शतकापासून मराठी भाषिक लोकाच्यात राजकीय व सांस्कृतीक अस्मितेची जाणीव वाढीस लागली असे असले तरी राजकीयदृष्टया मराठी भाषिक लोक प्रत्येक्षात विखुरलेले होते. 1 मे 1960 रोजी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. पण यासाठी 105 हुतात्म्यांना यासाठी बलीदान दयावे लागले होते. यासाठी व यातून महाराष्ट्रामध्ये सर्वात व्यापक चळवळी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या माध्यमातून जनआंदोलन उभारले गेले होते. समान मराठी भाषेचा वापर करणाऱ्या जनतेचे भाषावार प्रदेश रचना तत्वाच्या आधारावर एक राज्य स्थापन होण्याच्या दृष्टीकोनातून चालविलेली चळवळ संयुक्त महाराष्ट्र आंदोलन होय[2].

लोकशाही व समाजवाद यावर निष्ठा असलेली. भारताचे ऐक्य, अभंगत्व, सुरक्षितता व सार्वर्भामत्व साधणारी व भारतीय राज्यघटना मान्य असलेली महाराष्ट्रातील सर्व जनतेची व्यापक संघटना असे संयुक्त महाराष्ट्र समितीचे स्वरुप निश्चित केले.[3] या चळवळीत जनतेप्रमाणेच विविध नेत्यांनी महत्वाची भूमिका पार पाडलेली दिसते. याला मराठवाडयातील उस्मानाबाद जिल्हाही याला अपवाद ठरला नाही. तसेच याच चळवळीतील उध्दवराव पाटील यांचे योगदानही महाराष्ट्राच्या इतिहासात नमूद करण्यासारखेच आहे.

मुंबई शहरामुळे महाराष्ट्र व गुजरात यांचे मिळून द्विभाषिक राज्य निर्माण झाले होते. ते मोडीत काढून संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्यासाठी विविध प्रकारे आंदलने, मोर्चे आयोजित करावे लागले होते. त्यात इतराप्रमाणे उद्वराव पाटील हे ही आघाडीवर होते. संयुक्त महाराष्ट्र राहावा या प्रश्नासाठी दिल्ली येथील केंद्र शासनाला जागे करण्याच्यादृष्टीने समितीने दिल्ली येथे एका मेळाव्याचे आयोजन केले होते. यानुसार दिल्लीच्या बोटक्लब येथे एक लाख लोकांचा मेळावा घेण्यात आला होता. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सुकाणू समितीचे सर्व नेत्यांची भाषणे झाली होती. तरी उध्दवराव पाटील यांनी मेळाव्याला उददेशून केलेल्या उर्दू भाषेतील भाषण विशेष प्रभावी

ठरले. त्यांच्या या भाषणाने दिल्लीकरांचे लक्ष वेधले. परिणामी त्यांच्या भाषणाला बिगर मराठी जनसमुदायानेही उत्स्फुर्तपणे पाठींबा दिला होता[4].

संयुक्त महाराष्ट्राच्या लढयात उध्दवराव पाटील यांची भूमिका दैदिप्यमान होती. सभा, बैठका, परिषदांच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्राचा ग्रामीण भाग पिंजून काढलेला होता. त्यांच्या या नेतृत्वगुणामुळे एस.एम. जोशी, ना.ग.गोरे, डांगे व दादासाहेब गायकवाड यांनी त्यांना सभा, बैठका आणि मेळाव्यांची तोफ बनविले हे उल्लेखनीय आहे व संयुक्त महाराष्ट्र समितीची धुरा उध्दवराव पाटील यांच्या खांदयावर दिली. नंतर त्यांनी अनेक जोमाने पायाला भिंगरी बांधल्याप्रमाणे त्यांनी अनेक दौरे केले. यासाठी अपार कष्ट उपसतानाच मोर्चे, भाषणे व आंदोलनाने सरकारला दे माय धरणी ठाय करुन सोडले होते.[5]

कॉंग्रेसच्या राज्यकर्त्यांनी द्विभाषिकाचे नाटक केले व संयुक्त महाराष्ट्राला विरोध केला. त्यात यशवंतराव चव्हाणासारखे सुध्दा बळी गेले. पण मराठी जनतेने प्रचंड आंदोलन उभारुन द्विभाषिक राज्याची संकल्पना मोडीत काढली होती व मुंबई मुक्त करुन मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्यास शासनाला भाग पाडले. खऱ्या अर्थाने संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश उद्दवराव पाटील वगैरे संयुक्त महाराष्ट्रवादी जनतेने आणला. कॉंग्रेसची सत्ता संपूर्ण देशभर होती म्हणून यशवंतराव चव्हाण यांचे नाव झाले इतकेच. महाराष्ट्रात कॉंग्रेसचे राज्य उलथवून पाडण्याची भिती निर्माण झाली होती. म्हणूनच मुंबईसह महाराष्ट्र दिला.[6] असे असले तरी शेवटी संपूर्ण महाराष्ट्र राज्यकर्त्यांनी दिला नाही हेही मान्य करावे लागेल.

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर सीमा प्रश्न शिल्लक राहिला होता. कॉंग्रेस पुढाऱ्यांचा संधीसाधूपणा व संयुक्त महाराष्ट्र समितीतील नेत्यांचा बोटचेपेपणा नडला गेला होता. अर्थात महाराष्ट्रातील जनतेला सीमाप्रश्नावर पुन्हा चळवळ उभी करणे भाग पडले. ती आजही अखंडपणे चालू असताना दिसते. संयुक्त समितीचे सीमा समितीचे अध्यक्षपद उध्दवराव पाटील यांचेकडे दिले गेले. हे आंदोलन उद्दवराव यांनी खंबीरपणे उभी केली. समितीच्या या सर्व कामकाजात उद्दवराव पाटील, व्ही.डी. चितळे, दत्ता देशमुख व एस. एम. जोशी आदीनी जीवाचे रान केले. समितीच्या वतीने पुकारलेला साराबंदी लढा सर्वावरचा कळस होता. हे सर्व घडवून आणण्यात उद्दवराव पाटील यांचा सिंहाचा वाटा होता. येलून गावामध्ये साराबंदी आंदोलनात अटक केली गेली व त्यांना दोन महिने तुरुंगात डांबण्यात आले होते. सीमाभागीय लढयातील सुसंगत व शास्त्रोक्त पध्दतीने भूमिका बजावणारे समितीमध्ये उध्दवराव पाटील हे एकमेव नेतृत्व होते.[7] हे नाकारता येणार नाही.

सीमा भागातील हजारो सीमावासियांचे अंतकरणे उध्दवराव पाटील यांनी काबीज केली होती. सीमा भागातील वासियांना त्यांच्या कर्तृत्वावर प्रचंड विश्वास होता. त्यांनी संचारबंदी आंदोलनात पोलिसांना पळता भुई करुन सोडले. कोल्हापूर येथील सन 1967 या महाजन आयोगासमोर त्यांनी



CamScanner

विराट मोर्चा आणून राज्यकर्त्यांना जेरीस आणले होते. पाटसकर अवॉर्डप्रमाणे मद्रास व म्हैसूर राज्याचा ज्याप्रमाणे प्रश्न सोडविला त्याचप्रमाणे कर्नाटक सीमाभागाचा प्रश्न पाटसकर अवॉर्डने सोडवावा ही त्यांची मागणी होती. हे त्यांनी राज्याच्या विधानसभेत सातत्याने मांडले आहे. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सीमाभागामुळे अर्धवट सुटल्याने त्यांना अखेरपर्यंत खंत वाटत राहीली. सीमाभागातील कार्यामुळे लोकप्रिय बनलेले उध्दवराव पाटील त्यांना न्याय देवू शकले नाहीत याची जाणीव त्यांना सतत होत असे. अर्थात औरंगाबाद येथील सत्काराला उत्तर देतांना ते म्हणाले की, संयुक्त महाराष्ट्र लढयाबाबत मुंबईबददल सर्व विरोधी पक्ष व सत्ताधाऱ्यात मतभेद होते. परंतु बेळगाव, कारवार व निपाणी या भागाबददल कोणाचाही मनात मतभेद नव्हते. तो प्रश्न मात्र तसाच राहीला. मी जीवंत असे पर्यंत हा प्रश्न सुटल्याचे पाहण्याचे भाग्य मला लाभावे.[8] तसेच सीमाभागातील लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सतत प्रयत्न करीत राहीन यातच त्यांचे सर्व मुल्यमापन येते.

आजचा महाराष्ट्र हा एका मोठया त्याग बलिदानाच्या आहुतीतून उभा राहीलेला दिसतो. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी स्वतःच्या त्यागासोबत जनजागृती करुन सामान्य जनतेचे जनआंदोलन उभारण्यामध्ये उध्दवराव पाटील यांचे योगदान महत्वाचे आहे. ग्रामीण भागातील लोकांचा जनाधार मिळवून देण्यातही त्यांनी महत्वाची भूमिका बजावलेली दिसते. त्यांनी या समितीच्या माध्यमातून सरकारला संयुक्त महाराष्ट्रासाठी जेरीस आणले व खऱ्याअर्थाने संयुक्त महाराष्ट्राचा मंगलकलश आणण्यात उध्दवराव यांनी महत्वपूर्ण कार्य केले.

**तळटिपा :–**


1. रविकिरण साने,'लढा संयुक्त महाराष्ट्राचा' डायमंड पब्लिकेशन पुणे, प्रथम आवृत्ती 2009 पृ.क. 5.
2. विजया वाड (संपा.) मराठी विश्वकोश खंड 18 महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई 2009 पृ.क. 457
3. गणेश राऊत, 'महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास' (1818 ते 1960) डायमंड पब्लिकेशन पुणे. प्रथम आवृत्ती 2005 पृ.क. 109
4. अनुराधा मोहनी संपादकीय आजचा सुधारक ऑक्टोबर 2011 पृ. क. 275
5. अनंतराव माधवराव पाटील, झुंजार सेनानी उध्दवराव, दैनिक संघर्ष 12 जुलै 2001 पृ.क. 14.
6. झुलाल भिलाजीराव 'उतुंग व्यक्तीमत्व कै. उध्दवरावदादा, दैनिक संघर्ष 2 जुलै 2011 पृ. क. 4.
7. शहाजी पाटील, उध्दवराव पाटील विविध अंगी राजकीय नेतृत्व अप्रकाशित शोधनिबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर 1988 पृ.क. 7.
8. औरंगाबाद येथील उध्दवराव पाटील यांच्या सत्काराच्या ध्वनीमुद्रीत भाषणाच्या आधारे.




CamScanner